Shri Dhaneshwari Manav Vikas Mandal's

# S.S.V.P. Homoeopathic Medical College & Research Institute – Hatta

(Recognized by Ayush Ministry – New Delhi, Govt of Maharashtra & Affiliated by University Of Health Sciences, Nashik)

Gut No.421, At Hatta Tq Basmath Dist. Hingoli – 431 705

Web: www.ssvphmc.org ✦ Email Id: svphomeopathicchatta@gmail.com

**Dr. VK Patil**
**President**

**Dr. MD. Hilal A.H**
(MD. Hom) **Cell - 9970719120**
**Principal**

OW/NO/:- SDMVM'S/SSVP/HMC/HATTA/ /2023 DATE:-

S.S.V.P. Homoeopathic College & R.I. HATTA Tq.Basmath Dist.Hingoli.

**Part III – Academic Details**

Student's participation

## Participation of University Level Spandan Yuva Mahotsav Dance , Singing , etc

| Sr. No | Name of The students | Class | Competitions | Participation |
|---|---|---|---|---|
| 1. | Snehal Galte | BHMS – Ist | Dancing | Yes |
| 2. | Hariom Nikam | BHMS- Ist | Dancing | Yes |
| 3. | Yash Latad | BHMS - III | Dancing | Yes |
| 4. | Bhagyashree Mathpati | BHMS-III | Dancing | Yes |
| 5. | Gitanjali Sabankar | BHMS- Ist | Singing | Yes |
| 6. | Ramkishan Kapse | BHMS-IV | Dancing | Yes |
| 7. | Bhakti Maske | BHMS-I | Dancing | Yes |
| 8. | Ajinkya Upade | BHMS-II | Singing | Yes |

PRINCIPAL
S.S.V.P. Homoeopathic
College & R.I. Hatta
Tq Basmath Dist. Hingoli

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
## MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik – 422004
Tel : (0253) 2539179/169/173/174 ☎ Student Helpline : 0253-2539111/6659111
Website: www.muhs.ac.in, E-mail: sw@muhs.ac.in

**डॉ. मनोजकुमार बी. मोरे** | **Dr. Manojkumar B. More**
एम.डी. (आयुर्वेद) | M.D. (Ayurved)
**संचालक, विद्यार्थी कल्याण** | **Director, Student Welfare**


जा.क्र.:मआविवि/वि.क./रासेयो/५४६/२०२३ दि. ३१/०३/२०२३

प्रति,
अधिष्ठाता / प्राचार्य,
श्री. शांतादेवी वेदप्रकाश
पाटील होमिओपॅथी वैद्यकीय
महाविद्यालय आणि संशोधन
केंद्र, गट नं. ४२१, हट्टा, ता. वसमत,
जि. हिंगोली - ४३१७०५.

S.S.V.P. Homoeopathic College & R.I. HATTA Tq.Basmath Dist.Hingoli.

**विषय :- सन २०२२-२३ या वर्षापासुन पुढे राष्ट्रीय सेवा योजना एकक (NSS Unit) सुरु करण्यास परवानगी देणेबाबत...**

**संदर्भ :- आपले पत्र क्र.** SDMVM/SSVP/HMC/Hatta/2022/300
Date - 05/11/2022

**महोदय / महोदया,**

वरील विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, संदर्भांकित पत्राद्वारे आपण राष्ट्रीय सेवा योजना एककाची (N. S. S. Unit) मागणी केली आहे. त्यानुसार आपल्या महाविद्यालयास ५० स्वयंसेवक (विद्यार्थी) संख्येचे राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S. Unit) सन २०२२-२३ यावर्षापासून पुढे सुरु करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून याव्दारे परवानगी देण्यात येत आहे.

१. राष्ट्रीय सेवा योजना ही केंद्र व राज्य शासन यांची संयुक्तरित्या पुरस्कृत योजना आहे. विद्यापीठास सलंग्नित व इच्छुक महाविद्यालयांनाच राष्ट्रीय सेवा योजना एकक देण्यात येते. हया योजनेअंतर्गत नियमित कार्यक्रम व विशेष शिबीर असे दोन उपक्रम राबविले जातात. सदर उपक्रम राबविण्यासाठी शासनाकडुन मर्यादीत अनुदान प्राप्त होत असते. त्यामुळे रासेयो एकक महाविद्यालयांनी नियमांनुसार दोन्हीही कार्यक्रम राबविणे अनिवार्य आहे.

२. महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे कामकाज पाहण्यासाठी एक कार्यक्रम अधिकारी व दोन सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (एक पुरुष व एक महिला) यांची नियुक्ती करावी. रासेयो कार्यक्रम अधिकारी हे प्रपाठक (Reader) किंवा वरीष्ठ व्याख्याता (Lecturer) स्तरावरचे असावेत. रासेयो कार्यक्रम अधिकारी व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांची नियुक्ती केल्यानंतर त्यांची माहिती सोबत जोडलेल्या नमुन्यात लवकरात लवकर विद्यापीठास सादर करावी.

३. राष्ट्रीय सेवा योजनेचे काम पाहण्यासाठी नियुक्त केलेले कार्यक्रम अधिकारी व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांनी कमीत कमी ३ वर्षे काम करणे बंधनकारक राहील. त्यांचे नियुक्तीपत्र व ३ वर्षे काम करण्याचे त्यांनी दयावयाचे हमीपत्र विद्यापीठास सादर करावे.

४. रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांसाठी टी.ओ.सी (T.O.C.), अहमदनगर यांच्याकडुन ०७ दिवसांची रासेयो परिचय प्रशिक्षण कार्यशाळा (Orientation Training) आयोजित केली जाते. सदर कार्यशाळेसाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांना विद्यापीठाकडुन आदेश प्राप्त झाल्यानंतर महाविद्यालयाने त्यांना प्रशिक्षणासाठी पाठवावे. सदर प्रशिक्षणाचा खर्च संबंधित महाविद्यालयाने करावा. प्रत्येक कार्यक्रम अधिकाऱ्यांनी त्यांच्या नियुक्तीच्या कालावधीत एकदा रासेयोचे परिचय प्रशिक्षण घेणे बंधनकारक आहे.

५. शासनाकडुन विद्यापीठास प्रत्येकवर्षी रासेयोचे कार्यक्रम राबविण्यासाठी मिळालेले अनुदान रासेयो एकक महाविद्यालयांना एकक संख्येनुसार वाटप करण्यात येते. त्यामुळे महाविद्यालयातील रासेयो एककाचे राष्ट्रीयकृत बँकेत स्वतंत्र संयुक्तीक खाते उघडावे. सदर खाते महाविद्यालयाचे अधिष्ठाता/प्राचार्य व कार्यक्रम अधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने परिचालन करावे. विद्यापीठाकडुन मिळालेले अनुदान सदर खात्यातच जमा करावे व रासेयोशी निगडीत सर्व व्यवहार या खात्यामधूनच करावा. तसेच रासेयो एककाचे खाते असलेल्या बँकेचे नाव, खाते क्रमांक, आयएसएफसी कोड वगैरे आवश्यक माहिती विद्यापीठास कळवावी.

६. राष्ट्रीय सेवा योजनेत स्वयंसेवकांची नोंदणी करतांना शक्यतो महाविद्यालयात द्वितीय व तृतीय वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांचीच नोंदणी करावी. नोंदणी केलेल्या स्वयंसेवकांची प्रवर्गनिहाय नावाची यादी सोबत जोडलेल्या नमुन्यात विद्यापीठास पाठवावी. नोंदणी करावयाच्या विद्यार्थी स्वयंसेवकांमध्ये सुमारे ११.८% टक्के अनुसुचित जातीचे व ९.४% टक्के अनुसुचित जमातीचे विद्यार्थी असावेत.

७. रासेयो अंतर्गत विशेष शिबीर कार्यक्रम शक्यतो दि. १५ ऑगस्ट ते २८ फेब्रुवारी या कालावधीत आयोजीत करावे व तद्नंतर नियमित शिबीर व विशेष शिबीर कार्यक्रमाच्या संपुर्ण जमा खर्चाचे वेगवेगळे (स्वतंत्र) हिशोब सनदी लेखापरिक्षकाकडुन (C. A.) लेखापरीक्षण करुन घ्यावे. महाविद्यालयास विद्यापीठाकडून प्रत्येक आर्थिक वर्षासाठी देण्यात येणाऱ्या नियमित व विशेष शिबीर कार्यक्रमाच्या अनुदानाच्या रकमेचा हिशोब विहीत नमुन्यात कुठल्याही परिस्थितीत प्रत्येकवर्षी दि. १० एप्रिल पर्यंत विद्यापीठास प्राधान्यक्रमाने सादर करावेत. रासेयोच्या कार्यक्रमांसाठी खरेदी केलेल्या वस्तुंच्या बिलाची छायांकित प्रत अधिष्ठाता/प्राचार्य यांच्या स्वाक्षरीने साक्षांकित करुन हिशोबासोबत सादर कराव्यात. सदर हिशोब वेळेत प्राप्त न झाल्यास आपल्या महाविद्यालयाने सदर वर्षाचे विद्यापीठ अनुदान खर्च केले नाही असे समजून देण्यात आलेले अनुदान महाविद्यालयाकडुन परत घेण्यात येईल, किंवा महाविद्यालयाने केलेल्या खर्चाची प्रतिपुर्ती करण्यात येणार नाही. तसेच महाविद्यालयातील रासेयो एकक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम राबविण्यास अकार्यक्षम आहे असे समजून एकक बंद करण्यात येईल याची कृपया अधिष्ठाता / प्राचार्य व कार्यक्रम अधिकारी यांनी विशेष नोंद घ्यावी.

८. रासेयोचे नियमित कार्यक्रम व विशेष कार्यक्रम घेण्याविषयीची माहिती सोबत जोडलेल्या परिशिष्टांमध्ये (Appendix) देण्यात आलेली आहे. सदर माहितीच्या अनुषंगाने रासेयोचे कार्यक्रम राबवावे व त्याचा अहवाल विहित केलेल्या कालावधीत सोबत जोडलेल्या नमुन्यात विद्यापीठास सादर करावा.

९. राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सहभागी होणाऱ्या स्वयंसेवकांनी नियमित कार्यक्रमांमध्ये दोन वर्षे (प्रति वर्ष १२० तास) तसेच मंजूर केलेल्या एकक संख्येच्या ५० टक्के स्वयंसेवकांनी सात (०७) दिवसांच्या विशेष शिबीर कार्यक्रमात एकदा सहभागी होणे बंधनकारक राहिल. सदर बाबींची पूर्तता करणाऱ्या स्वयंसेवकांना त्यांच्या अंतीम परिक्षेत ते उत्तीर्ण होत असल्यास अतिरिक्त १० (दहा) गुणांचा लाभ तसेच रासेयोचे सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

S.S.V.P. Homoeopathic College & R.I. HATTA Tq.Basmath Dist.Hingoli.

१०. महाविद्यालयातील रासेयो एककाचा ४ फुट × ३ फुट आकाराचा फलक तयार करुन महाविद्यालयाच्या दर्शनी भागावर लावावा.

वर नमुद केलेल्या बाबींपैकी सद्यस्थितीत विद्यापीठास सादर करावयाच्या दस्तऐवजांची पूर्तता करुन सदर माहिती / दस्तऐवज विद्यापीठास दि.०५/०४/२०२३ पर्यंत सादर करावीत.

कळावे,

संचालक,
विद्यार्थी कल्याण तथा
रासेयो कार्यक्रम समन्वयक

**सोबत :-**

१) परिशिष्ट 'अ' ते 'ग' (Appendix 'A' to 'G')
२) हिशोब सादर करण्याचा नमुना (Account Format Appendix 'A' to 'N')
३) मासिक अहवालाचा नमुना (Monthly Report Format)
४) रासेयो पुस्तिका (NSS Mannual)

S.S.V.P. Homoeopathic College & R.I. HATTA Tq.Basmath Dist.Hingoli.

PRINCIPAL
S.S.V.P. Homoeopathic
College & R.I. Hatta
Tq. Basmath Dist. Hingoli